लोकमत

# तीन वर्षांच्या मुलाचे अवयवदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : वांद्रे येथील लीलावती रुग्णालयात बुधवारी तीन वर्षांच्या मुलाचा मेंदूमृत झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी अवयवदानाचा निर्णय घेतल्याने अवयवांच्या प्रतीक्षेत असणाऱ्या रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. या अवयवदानातून यकृत आणि डोळे दान केले गेले.

हे मुंबई शहरातील या वर्षातील २६ वे अवयवदान आहे. मुळातच आपल्याकडे अवयवदान कमी प्रमाणात होते, त्यात लहान मुलांचे अवयवदान ही दुर्मीळ घटना आहे. याप्रकरणी मुंबई विभागीय प्रत्यारोपण समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र माथूर यांनी सांगितले, 'पालकांचा हा मोठा निर्णय आहे. त्यांनी त्यांच्या दुःखद प्रसंगी हा निर्णय घेऊन एका रुग्णाला जीवनदान तर एका रुग्णाला दृष्टी मिळण्यासाठी डोळे दान केले.'

Hello Mumbai
Page No. 1 Jul 20, 2023
Powered by: erelego.com